# ऋणनिर्देश

इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी **"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास"** या विषयावरील माझ्या संशोधन कार्यात माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. शेंडे एस. आर. यांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन लाभले त्यांच्याविषयी ऋणनिर्देश व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते. त्यांचे केवळ आभार मानणे हा या मागे हेतू नसून त्यांच्या ऋणात मी राहू इच्छिते.

माझ्या संशोधन विषयाच्या अनुषंगाने मी सोलापूर, पुणे, अहमदनगर आणि मुंबई येथील ग्रंथालयांना व पुराभिलेखागारास भेटी दिल्या. तेथील ग्रंथपाल, पुराभिलेखागारातील संचालक व सेवक वर्ग, ग्रंथालय भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, पुणे व मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, तसेच सोलापूर शहरातील हिराचंद नेमचंद वाचनालयातील ग्रंथपाल दत्तात्रय मोरे आणि सौ. माधुरी करंटे व त्यांचे सहकारी, दयानंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुहास भोजगे, वालचंद महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. वंदना गवळी आणि छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे ग्रंथपाल  नागनाथ नवगिरे,  या सर्वांच्या सहकार्यामुळेच माझे संशोधनाचे कार्य सहज व सुलभ झाले.

सोलापूर शहरातील विविध देवस्थान समितीचे प्रमुख, मंदिरांचे पुजारी, विविध मठांतील मठाधिपती, मशिदिंचे इमाम, यांनी केलेल्या सहकार्याबद्‌दल मी त्यांचेही आभार मानते.

संशोधन करताना मला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अशा अडचणीतही ज्यांनी माझ्या मनात सकारात्मक विचार रुजवून सतत सहकार्य व प्रोत्साहन दिले ते माझे पती प्रा. डॉ. सोपान जावळे, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय सोलापूर यांच्या ऋणात राहणे मी पसंत करेन.

मुख्यत्त्वेकरून डॉ. श्रध्दा कुंभोजकर, डॉ. कारेकर सर, डॉ. वाते , डॉ. संध्या पंडीत आणि सौ. मंगल शेंडे यांचेही मला प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचेही मी आभार मानते. सोलापूर येथील छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश पवार, प्राचार्य. डॉ. बी. व्ही. चौधरी, डॉ. मोहन चौगुले, प्रा. मधुकर पवार,  प्रा. विमल माने, प्रा. अरुण सोनकांबळे, डॉ. लता अकलूजकर, डॉ. विलास निंबाळकर, डॉ. चंद्रकांत चव्हान, प्रा. भारत जाधव, प्रा. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. मारूतीराव सावंत, प्रा. मारूतीराव मस्के, डॉ. रवी जाधव, डॉ. नभा काकडे, डॉ. संजय गायकवाड, प्रा. प्रभाकर

कोळेकर, प्रा. बळीराम जाधव, प्रा. शशिकांत साळुखे, श्री. सुकुमार मोहळे, ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज व जुने विठ्ठल मंदिराचे पुजारी किरण जोशी यांनी दिलेल्या सहकार्य व प्रोत्साहनाबद्दल त्यांचेही आभार मानते.

मी ज्या महाविद्यालयात इतिहास विषयाच्या अध्यापनाचे कार्य करीत आहे त्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे व सचिव प्रा. डॉ. अनिल बारबोले यांची प्रेरणा व आशिर्वादामुळे माझ्या संशोधनाला गती प्राप्त झाली, त्यांचेही आभार मानते.

माझ्या संशोधन कार्यात माझी मुले पूनम, प्रतिक्षा व निरंजन यांची मला मोलाची साथ मिळाली. माझे शिक्षण पूर्ण करून मला संशोधनासाठी सतत प्रोत्साहित करणारे माझे वडील नवनाथ नागणे व आई हौसाबाई यांच्या ऋणात राहणेच पसंत करते. माझे बंधू शांतीनाथ व अंबरनाथ नागणे आणि माझे शजारी श्री. व सौ. कामत यांनी मला वेळोवेळी सहकार्य दिले.

या प्रबंधांचे सुबक, सुयोग्य असे संगणकीकृत काम परिश्रमपूर्वक केल्याबद्दल श्री. तानाजी शिवाजी वाघ व श्री. मुकूंद शंकर फाळके, प्रथमेश कॉम्प्युटर टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर, तसेच छायाचित्रकार जयजित पटवा सोलापूर यांचेही आभार मानते. या प्रबंध लेखनासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या सर्वांचे आभार मानते.

**संशोधक**

**नागणे अमिता नवनाथ**